नि. फौ. खटला क्र. **<u>२०४/२०२१</u>**
सरकार विरूद्ध गोविंदराम व इतर
**निशाणी २७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : कमल अनिलकुमार जेसवाणी
वय : ३० वर्षे,
धंदा : व्यापार,
राहणार : सिंधी कॉलनी, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी क्र. १ मयत झाला असुन आरोपी क्र. २ ते ४ न्यायालयासमक्ष हजर आहेत. मी फिर्यादी दिलीप जेसवाणी याला देखील ओळखतो. ते माझे काका आहेत. मला घटनेबाबत काहीच माहिती नाही. मी घटनेवेळी बाहेर माझ्या दुकानात होतो. माझेसमक्ष कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले नाही.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/०७/२०२१ रोजी दुपारी ३—४ वाजेदरम्यान आरोपींनी पावसाच्या पाण्याच्या कारणावरून फिर्यादी व त्याच्या कुटूंबाशी वाद घातला व आरोपींनी फिर्यादीला हरामखोर, मादरचोद, भोसडीके अशी अश्लील

शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीचा मुलगा नविन यास त्याची गच्ची धरून त्याला थापडा—बुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ हा फावडा घेउन फिर्यादीच्या अंगावर धाउन आला व सदर वेळी फिर्यादीची आई व पत्नी फिर्यादीला वाचवण्यासाठी आली असता सदर आरोपींनी त्यांनादेखील लोटलाट केली व अश्लील शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला 'घर के बाहर निकल आज तुझे खल्लास कर देंगे अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेवेळी मी त्याठिकाणी हजर होतो. आता मला माझे बयानातील अधारेखांकित भाग अ वाचुन दाखवण्यात आला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानामध्ये नमुद असल्याचे कारण मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींसोबत फिर्यादीची न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झालेली आहे हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत न्यायालयाबाहेर फिर्यादीची तडजोड झाल्यामुळे फिर्यादीच्या सांगताण्यावरून आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — सर्व आरोपींतर्फे ॲड. श्री. वाजिद अली यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १४.०५.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.